तरुण भारत
# सदाफुली
https://dainiktarunbharat.com
https://epaper.dainiktarunbharat.com
बुधवार, २६ मार्च २०२५

आतील पानावर

पान २ –दीपिका–प्रभासच्या ब्लॉकबस्टर ...
पान ३ – ईशा आणि अजयच्या अफेयरच्या चर्चा
पान ४ – नाव ऐकूनच सिनेमाला होकार दिला...
पान ५ – मी बॉलिवूड शब्दाचा फॅन नाही
पान ७ – मराठी अभिनेत्री दिसणार तेलुगु सिनेमात

# समांथा ठरली सर्वात लोकप्रिय अभिनेत्री

पुन्हा बॉलिवूडवर साऊथ भारी पडल्याचं पाहायला मिळतयं. साऊथ सुंदरीनं अभिनत्री दीपिका पादुकोण आणि आलिया भटलाही लोकप्रियतेच्या बाबतीत मागे टाकलं आहे. फेब्रुवारी २०२५ मधील भारतातील सर्वात लोकप्रिय महिला कलाकारांची यादी ऑरमॅक्स मीडियाने जाहीर केली आहे. या यादीत १० सुंदरींची नावे आहेत, ज्यात बॉलिवूडपासून ते दक्षिण इंडस्ट्रीपर्यंतच्या अभिनेत्रींचा समावेश आहे. यावेळी, लोकप्रियतेच्या बाबतीत दक्षिणेकडील अभिनेत्रीने आघाडी घेतली आहे.

**लोकप्रियतेच्या यादीत दक्षिणेकडील अभिनेत्रींचे वर्चस्व**

दिसतंय. १० पैकी ८ नावे दक्षिणेतील अभिनेत्रींची आहेत. अभिनेत्री समांथा रूथ प्रभू ही भारतातील सर्वात लोकप्रिय महिला चित्रपट कलाकारांच्या यादीत अव्वल स्थानावर आहे. आलिया भट्ट दुसऱ्या क्रमांकावर तर दीपिका पदुकोणचे नाव तिसर्या स्थानावर आहे.  साई पल्लवी या यादीत चौथ्या क्रमांकावर आहे. लोकप्रियतेच्या बाबतीत काजल अग्रवाल पाचव्या स्थानावर आणि रश्मिका मंदान्ना सहाव्या स्थानावर आहे. यासोबतच त्रिशा कृष्णननं सातवं स्थान पटकावलं आहे. नयनतारा ही आठव्या क्रमांकावर, श्रीलीला नवव्या क्रमांकावर आणि अनुष्का शेट्टी दहाव्या क्रमांकावर आहे. अभिनेत्रींसोबतच सर्वात लोकप्रिय अभिनेत्यांची यादी देखील जाहीर झाली. प्रभास हा सर्वात लोकप्रिय अभिनेता ठरला आहे. तर थलापती विजयचे नाव दुसऱ्या क्रमांकावर आहे आणि अल्लू अर्जुनचे नाव तिसर्या क्रमांकावर आहे. या यादीत शाहरुख खान चौथ्या स्थानावर आहे आणि राम चरण पाचव्या स्थानावर आहे. एकूणच दाक्षिणात्य अभिनेत्री आणि अभिनेत्यांनी वर्चस्व गाजवलं आहे.





# हृतिकच्या 'क्रिश ४' च्या शूटिंगचा मुहूर्त ठरेना!

स्टाइलिश स्टार हृतिक रोशनच्या क्रिश ४ चित्रपटाची मोठी उत्सुकता प्रेक्षकांमध्ये आहे. या चित्रपटाबाबत अनेक नवे अपडेट्स बऱ्याच दिवसांपासून येत आहेत. राकेश रोशन आणि त्यांची टीम गेल्या काही वर्षांपासून या चित्रपटावर काम करत आहे. दरम्यान, चित्रपटाचे शूटिंगही लवकरच सुरू होणार असल्याचे सांगण्यात आले आहे. मात्र बॉलीवूड हंगामाच्या रिपोर्टनुसार, 'क्रिश ४'चे बजेट इतके वाढले आहे की कोणताही स्टुडिओ हा चित्रपट बनवण्यास तयार नाही. जानेवारी महिन्यात राकेश रोशन यांनीही याबाबत खुलासा केला होता. चित्रपटाच्या बजेटमुळे अडचणी येत आहेत. 'क्रिश ४' लवकरच बनवणार आहे. वास्तविक या चित्रपटाच्या बजेटबाबत वारंवार अडचणी येत आहेत. हा खूप मोठ्या बजेटचा चित्रपट आहे जो मोठ्या स्केलवर बनवण्यात येणार आहे. जर आम्ही चित्रपटाचे बजेट कमी केले तर चित्रपटातील कथानकाशीही आम्हाला तडजोड करावी लागेल आणि मला या चित्रपटाशी कोणत्याही प्रकारची तडजोड करायची नाही, मला योग्य बजेटमध्ये योग्य प्रमाणात चित्रपट बनवायचा आहे आणि जेव्हा ते होईल तेव्हाच मी त्याचे शूटिंग सुरू करेन, असे राकेश रोशन यांनी एका वाहिन्याला दिलेल्या मुखाखतीमध्ये म्हटले होते. 'क्रिश ४' चित्रपटाचे जवळपास ७०० कोटी रुपयांचे बजेट आहे. इतका पैसा गुंतवून कोणताही स्टुडिओ धोका पत्करू इच्छित नाही, म्हणून चित्रपटाच्या चित्रीकरणाला अद्यापर्यंत सुरूवात करण्यात आलेली नाही. हृतिकचा मित्र आणि दिग्दर्शक सिद्धार्थ आनंद या चित्रपटाची निर्मिती करत आहे. या चित्रपटासाठी स्टुडिओ शोधण्याची जबाबदारी हृतिकने सिद्धार्थला दिली होती. मात्र, स्टुडिओ 'क्रिश ४'बाबत संकोच करत आहेत. सिद्धार्थने या चित्रपटाचे दिग्दर्शन करण्यासाठी करण मल्होत्राला साईन केले होते. आता सिद्धार्थने हा चित्रपट सोडल्यामुळे करणही चित्रपटाचे काम करणे सोडले आहे. आता या चित्रपटावर नवीन टीम काम करणार असल्याची माहिती आहे. त्यानुसार चित्रपटाचे बजेट पुन्हा तयार केले जाईल. हे सर्व प्रश्न सोडवल्यानंतरच चित्रपट फ्लोरवर जाऊ शकतो. 'वॉर २' ब्लॉकबस्टर ठरला तर 'क्रिश ४'लाही चांगला प्रतिसाद प्रेक्षक देतील, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.



# दीपिका-प्रभासच्या ब्लॉकबस्टर सिनेमाचा सीक्वल येणार?



अभिनेते अमिताभ बच्चन, कमल हसन, दीपिका पादुकोण आणि प्रभास यांची प्रमुख भूमिका असलेल्या 'कल्कि एडी: २८९८' या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घातला होता. नाग अश्विन दिग्दर्शित 'कल्की : २८९८ एडी' या चित्रपटाला प्रेक्षकांचाही उत्तम प्रतिसाद मिळाला. २७ जून २०२४ ला हा सिनेमा जगभरातील चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित झाला. एका महाकाव्यावर हा सिनेमा आधारित आहे. अशातच आता या ब्लॉकबस्टर चित्रपटाबद्दल मोठी अपडेट समोर आली आहे. लवकरच या चित्रपटाचा सिक्वेल येणार असल्याचं म्हटलं जात आहे. जवळपास वर्षभरापूर्वी प्रदर्शित झालेल्या या सुपरहिट चित्रपटच्या सीक्वेलची अधिकृत घोषणा निर्मात्यांनी केली आहे. गेल्या काही काळापासून या चित्रपटाच्या सिक्वेलबाबत चर्चा सुरू होती. आता 'कल्की : २८९८ एडी' चित्रपटाचं पटकथालेखन सुरू असल्याची माहिती समोर आली आहे. दिग्दर्शक नाग अश्विन माध्यमांसोबत संवाद साधताना चित्रपटाच्या सीक्वलबाबत हिंट दिली आहे. सर्वात मोठी गोष्ट म्हणजे 'कल्की : २८९८ एडी' च्या घवघवीत यशानंतर आता चित्रपटाच्या सीक्वलबद्दल प्रेक्षकांना उत्सुकता निर्माण झाली आहे. 'कल्की : २८९८ एडी' चे दिग्दर्शक नागा अश्विन यांनी दुसऱ्या भागात प्रभास असणार की नाही यासंदर्भात देखील महत्वाची अपडेट दिली आहे. माध्यमांसोबत संवाद साधताना नाग अश्विन यांनी दुसऱ्या पार्टमध्ये प्रभासचा स्क्रीन टाईम जास्त असणार आहे, असं सांगितलं आहे. त्यामुळे प्रभासचे चाहते सुखावले आहेत. दरम्यान, चित्रपटात अमिताभ बच्चन, दीपिका पादुकोण, तसंच अभिनेते कमल हासन असणार की नाही? हे पाहणं महत्वाचं ठरणार आहे.


# ईशा आणि अजयच्या अफेयरच्या चर्चा



अभिनेत्री हेमा मालिनी यांची मुलगी ईशा देओलने १४ वर्षांनंतर मोठ्या पडद्यावर कमबॅक केले आहे. बॉलीवूडमधील सेलिब्रिटींच्या अनेकदा अफेरच्या चर्चा रंगलेल्या असतात. ईशा देओल आणि अजय देवगणच्याही रिलेशनशिपची एकेकाळी चर्चा उठली होती. या दोघांनी काही सिनेमांमध्ये एकत्र काम केले आहे. यानंतर आता तिने एका मुलाखतीत अजय देवगणसोबतच्या डेटिंगच्या चर्चांबाबतेचे सत्य सर्वांसमोर उघड केलं आहे. एका मुलाखतीत ईशा म्हणाली, माझ्याबद्दलच्या काही चर्चा कदाचित खऱ्या असतील किंवा काही खोट्या असतील. त्यांनी माझं नाव अजय देवगणसोबतही जोडण्याचा प्रयत्न केला होता. माझं अजयसोबत खूप सुंदर आणि वेगळं नातं आहे. या नात्यात आदर, प्रेम आणि एकमेकांविषयी कौतुक आहे. त्यामुळे त्या चर्चा खूप विचित्र होत्या. त्यावेळी आम्ही कदाचित एकत्र बऱ्याच चित्रपटांमध्ये काम करू लागलो होतो, म्हणून या चर्चा सुरू झाल्या असतील. पण त्यात काहीही तथ्य नव्हतं. ईशा आणि अजयने 'युवा', 'मैं ऐसा ही हूँ', 'काल', 'इन्सान' आणि 'कॅश' या चित्रपटांमध्ये काम केले आहे. त्यानंतर २०२२ मध्ये 'रुद्र: द एज ऑफ डार्कनेस' या वेब सीरिजमध्येही दोघं पुन्हा एकत्र झळकले. डिस्ने प्लस हॉटस्टारवर ही सीरिज स्ट्रीम झाली होती. ती आता 'तुमको मेरी कसम' या सिनेमात दिसणार आहे. ज्यात अदा शर्मा, अनुपम खेर यांचीही भूमिका आहे. ईशा देओल गेल्या काही महिन्यांपासून तिच्या खासगी आयुष्यामुळेही चर्चेत होती. ईशाचा गेल्या वर्षी भरत तख्तानीसोबत घटस्फोट झाला. त्यांनी १२ वर्षांचा संसार मोडला. त्यांना दोन मुली आहेत.

# तुबांड-२ कधी रिलीज होणार?

तुंबाड हा चित्रपट २०१८ मध्ये रिलीज झाला होता. मात्र, या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर फारशी चांगली कामगिरी केली नाही. त्यानंतर काही वर्षांनंतर तुंबाड पुन्हा रि-रीलीज करण्यात आला. त्यावेळी चित्रपटाला प्रेक्षकांनी भरभरून प्रेम दिले. रि-रीलीजमध्ये तुबांडने चांगली कमाई केली. री-रिलीज दरम्यान, त्याचा सिक्वेल 'तुंबाड २' ची पोस्ट क्रेडिट सीनमध्ये घोषणा करण्यात आली होती. त्यानंतर चाहत्यांमध्ये पुढच्या भागाविषयी मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे. या चित्रपटात अभिनेता आणि निर्माता अशी दुहेरी भूमिका साकारणाऱ्या सोहम शाहने तुंबाडच्या दुसऱ्या भागाबाबत मोठा खुलासा केला आहे. पुन्हा रिलीज झालेल्या या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर ३१.३५ कोटींची कमाई केली. काही रिपोर्ट्समध्ये असा दावा करण्यात आला होता की 'तुंबाड २' चे बजेट १०० कोटी रुपये आहे. सोहम शाहने दिलेल्या मुलाखतीत यावर उत्तर दिले आहे. तो म्हणाला, तुंबाड २ चे बजेट काय आहे हे मला माहित नाही. होय, हे खरे आहे की दुसरा भाग मोठ्या स्केलवर असल्याने निश्चितच त्याचे बजेट मोठे असणार आहे. सहा वर्षांच्या मेहनतीनंतर पहिला भाग बनला आणि तो हिट झाला, अशी आठवणही सोहमने यावेळी सांगितली. सोहमच्या म्हणण्यानुसार, बॉक्स ऑफिसच्या आकड्यांमुळे लोकांना काही फरक पडत नाही. त्यावेळी काहीही ठरवलं नव्हतं, चित्रपट बनवणं हे एक अनोखे काम होतं. आता आमच्याकडे स्क्रिप्ट तयार आहे आणि २०२५ च्या अखेरीस शूटिंग सुरू होईल. 'तुंबाड २'च्या तयारी दरम्यान सोहम शाह अलीकडेच त्याच्या 'क्रेझी' या नवीन चित्रपटात दिसला आहे. हा एक सायकॉलॉजिकल थ्रिलर चित्रपट आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शन गिरीश कोहली यांनी केले आहे. सोहमने त्याची निर्मितीही केली आहे. या चित्रपटातील त्याची मुख्य भूमिका प्रेक्षकांना आवडली असून, मात्र बॉक्स ऑफिसवर हा चित्रपट फारशी कमाल करू शकला नाही.



# 'जाट' मधील भूमिकेसाठी रणदीपची तगडी मेहनत

बॉलिवूड अभिनेता सनी देओल मुख्य भूमिकेत असलेल्या 'जाट या सिनेमाची सर्वत्र चर्चा सुरु आहे. हा ॲक्शन पॅक्ड सिनेमा येत्या १० एप्रिल २०२५ ला प्रदर्शित होणार आहे. या बहुचर्चित चित्रपटात अभिनेता रणदीप हुड्डा खलनायकाची भूमिका साकारणार आहे. त्यामुळे प्रेक्षक देखील उत्सुक आहेत. शिवाय लक्षवेधी गोष्ट म्हणजे यामध्ये रणदीप आणि सनी देओलमध्ये काँटे की टक्कर पाहायला मिळणार आहे. या चित्रपटाप्रमाणे अभिनेता रणदीप हुड्डा देखील सातत्याने चर्चेत आहे. दरम्यान,अलिकडेच 'जाट' मधील रणदीप हुड्डाचा खलनायिकी लूकमधील पोस्टर रिलीज करण्यात आलं. त्यामुळे सिनेरसिकांना चित्रपटाबद्दल आणखी उत्सुकता निर्माण झाली आहे. परंतु सिनेमातील 'रणतुंगा'च्या लूकसाठी अभिनेत्याने भरपूर कष्ट आणि मेहनत घेतली आहे. या भूमिकेसाठी रणदीपने चक्क ८ किलो वजन वाढवलं असून आपल्या आवाजावर सुद्धा काम केल्याचं सांगण्यात येत आहे. रणदीप हुड्डाने 'स्वातंत्र्य वीर सावकर' या चित्रपटानंतर लगेचच 'जाट' या त्याच्या आगामी प्रोडजेक्टच्या शूटिंगला सुरुवात केली.

'स्वातंत्र्य वीर सावकर' मध्ये अभिनेत्याने त्याचं वजन कमी केलं होतं. त्यानंतर आता 'जाट' चित्रपटात आपला रॉ-लूक दिसण्यासाठी अभिनेत्याने चांगला प्रयत्न केला आहे. 'रणतुंगा'च्या भूमिकेसाठी परफेक्ट दिसण्यासाठी त्याने कोणताही कसर सोडलेली नाही. त्यामुळे हा चित्रपट आता प्रेक्षकांना किती भावतो? हे पाहणं महत्वाचं ठरणार आहे. दरम्यान, 'जाट' सिनेमात सनी देओलसह रणदीप हुड्डा, विनीत कुमार सिंग, रेजिना कॅसांड्रा, सैयामी खेर आणि स्वरूपा घोष यांसारख्या तगड्या कलाकारांची फली पाहायला मिळणाकर आहे. गोपीचंद मालिनेनी यांनी या चित्रपटाचं दिग्दर्शन केलं आहे.

# नाव ऐकूनच सिनेमाला होकार दिला...




अभिनेता जॉन अब्राहमचा 'द डिप्लोमॅट' सिनेमा १४ मार्च रोजी रिलीज होत आहे. डिप्लोमॅट जितेंद्र पाल सिंह यांच्यावर सिनेमा आधारित आहे. यामध्ये जॉन त्यांचीच भूमिका साकारत आहे. सिनेमात पाकिस्तानात राहणाऱ्या उज्मा अहमद या भारतीय मुलीच्या सुटकेची गोष्ट दाखवण्यात आली आहे. जॉनने नुकतंच एका मुलाखतीत सिनेमाचा अनुभव सांगितला. तसंच तो जेपी सिंह यांना दोन वेळा भेटला आहे असंही तो म्हणाला. दिल्लीची रहिवासी असलेली उज्मा अहमद या मुलीची इंटरनेटवरुन पाकिस्तानच्या ताहिरशी ओळख होते. ताहिर मलेशियात टॅक्सी ड्रायव्हर असतो. तो तिला तिकडे नोकरी असल्याचं सांगतो. त्याचं ऐकून उज्मा मलेशियाला जाते. काही दिवसांनी ती नातेवाईकांना भेटण्यासाठी पाकिस्तानला जाते. तिथे तिची ताहिरशी भेट होते. तो तिला झोपेच्या गोळ्या देतो आणि जीवे मारण्याची धमकी देत तिच्याशी बळजबरी निकाह करतो. भारतात परत येण्यासाठी उज्मा खूप प्रयत्न करते आणि इंडियन एम्बसीमध्ये पोहोचते. तिथे जे पी सिंह तिची मदत करतात. सत्य घटनेवर हा सिनेमा आधारित आहे. सिनेमाबाबतीत एका मुलाखतीत जॉन अब्राहम म्हणाला, मला सिनेमाचं नावच खूप आवडलं तिथेच मी होकार दिला होता. जिओ पॉलिटिक्समध्येही मला रस आहे. स्क्रीप्टही आवडली. मी जेपी सिंह यांना दोन वेळा भेटलो. ते खूपच साधे, सरळ आहेत. ते आमच्या सेटवरही आले होते. त्यांच्यात आणि माझ्या दोन साम्य आहेत. त्यांच्यासारखंच मला चेस खेळ आवडतो. मीही चार पावलं पुढचा विचार करत असतो. तसंच मी खूप ॲनालिटिकल आहे. एक डिप्लोमॅटही तसाच असतो प्रत्येक गोष्टीचा बारकाईने अभ्यास करणारा असतो. बाकी मला बॉडी लँग्वेजवरच जरा काम करावं लागलं. टीमसोबत यावर आम्ही खूप मेहनत घेतली.

# 'हेरा फेरी ३' मधून कार्तिकचा पत्ता कट

बॉलीवूड अभिनेते अक्षय कुमार, परेश रावल आणि सुनील शेट्टी यांच्या 'हेरा फेरी' आणि 'फिर हेरा फेरी' ला प्रेक्षकांचा मोठा प्रतिसाद मिळाला. आता या चित्रपटाच्या तिसऱ्या भागाची चाहते आतुरतेने वाट पाहत आहेत. या आधीच्या दोन्ही भागात अक्षय-परेश-सुनील यांचा धुमाकूळ पाहायला मिळाला होता. यादरम्यान 'हेरा फेरी ३'मध्ये कार्तिक आर्यन पाहायला मिळणार असल्याची चर्चा रंगली होती. परंतु त्याचा या चित्रपटातून पत्ता कट करण्यात आला आहे. याबाबत परेश रावल यांनी एका मुलाखतीत माहिती दिली आहे. परेश रावल यांनी एका मुलखतीत 'हेरा फेरी ३' च्या स्क्रिप्टबाबत विचारल्यावर ते म्हणाले, 'मी अजून स्क्रीप्ट ऐकली नाही. पण नक्कीच असेल आणि असलीच पाहिजे. कारण लोकांना सिनेमाकडून खूप आशा आहेत. लोकांना सीक्वेल हवा आहे म्हणून मी तो साईन केला आहे. कदाचित काहीतरी चांगलं निघेल.' कार्तिक आर्यनच्या 'हेरा फेरी ३' मधील एक्झिटबद्दल परेश रावलम्हणाले, 'कार्तिक आर्यन सिनेमासाठी साईन झाला होता. तेव्हा सिनेमाची गोष्ट वेगळी होती. त्यात कार्तिकची भूमिका म्हणजे त्याला राजू समजून पकडून आणतात अशी होती. मी पूर्ण स्क्रीप्ट ऐकली नव्हती पण हे त्यात होतं. आता सिनेमात कार्तिक नाही कारण गोष्टच बदलली आहे. सप्टेंबरपासून आम्ही शूटिंगला सुरुवात करणार आहोत.' यासोबतच सीक्वेलबाबत बोलताना ते म्हणाले, मुन्नाभाई एमबीबीएस नंतर 'लगे रहो मुन्नाभाई' हा खरा सीक्वेल आहे. जरा असा सिक्वेल बनवणार असाल तर सलाम आहे. पण जर फ्रँचायझीमधून फायदा घेण्यासाठी, पैसा कमावण्यासाठी करत असाल तर त्यात मजा नाही, अशी स्पष्ट भूमिका परेश रावल यांनी व्यक्त केली.



# विजय सेतुपती कामगारांसाठी आला धावून



दाक्षिणात्य अभिनेता विजय सेतुपती चित्रपटसृष्टीत काम करणाऱ्या कामगारांच्या मदतीसाठी धावून आला आहे. विजयने सिने कामगारांच्या घरांसाठी १ कोटी दान करण्याचा निर्णय घेतला आहे. विजयने चेन्नईमधील फिल्म एम्प्लॉइज फेडरेशन ऑफ साउथ इंडियाला (FEFSI) यासाठी मदत केली आहे. FEFSI ही संस्था तामिळ फिल्म आणि टीव्ही इंडस्ट्रीतील विविध भागांमधील २३ युनियनमधील २५००० कामगार आणि तंत्रज्ञांचं प्रतिनिधित्व करते. विजयने या संस्थेला १ कोटी रुपयांची मदत केली आहे. विजयच्या मदतीमुळे पडद्यामागे अहोरात्र राबणाऱ्या कामगारांना हक्काचं घर मिळणार आहे. ट्रेड ॲनालिस्ट रमेश बाला यांनी त्यांच्या एक्स अकाऊंटवर ही माहिती दिली की विजय सेतुपतीनं एक अपार्टमेंट कॉम्प्लेक्सच्या निर्मितीसाठी १.३० कोटींचं दान केलं आहे. या कॉम्प्लेक्सला त्याचच नाव देण्यात येणार आहे. त्यांनी यात लिहिलं की मक्कल सेल्वन विजय सेतुपतीनं घर बनवण्यासाठी FEFSI चित्रपट कर्मचाऱ्यांच्या यूनियनला १.३० कोटींचं दान केलं आहे. तर आता या अपार्टमेंट टॉवरला 'विजय सेतुपती टावर्स' असं नाव देण्यात येणार आहे. विजय सेतुपतीनं केलेल्या या कृतीचं अनेकांनी कौतूक केले आहे. तमिळनाडूचे उपमुख्यमंत्री आणि अभिनेता उदयनिधी स्टालिन यांनी अधिकृतपणे एक नवीन आदेश दिला आहे. त्यांच्या अंतर्गत FEFSI तमिळ चित्रपट निर्माता काउंसिल, साऊथ इंडियन आर्टिस्ट्स असोसिएशन आणि तमिलनाडु स्मॉल स्क्रीन आर्टिस्ट असोसिएशनसोबत प्रमुख इंडस्ट्री संघाला जमीन देण्यात आली आहे.

विजय सेतुपतीच्या कामाविषयी बोलायचं झालं तर, त्यानं श्रीराम राघवनच्या 'मेरी क्रिसमस' पासून सुरुवात केली. त्यात कतरिना कैफ देखील दिसली होती. त्याशिवाय त्याचा 'महाराज' आणि 'विदुथलाई पार्ट २' चित्रपट प्रदर्शित झाला. विजय लवकरच 'गांधी टॉक्स', 'ऐस' आणि 'ट्रेन' या चित्रपटांमध्ये दिसणार आहे.




# 'पुष्पा ३' कधी होणार रिलीज?

अभिनेता अल्लू अर्जुनच्या 'पुष्पा : द राईज' या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घातला. या सिनेमाने जगभरात यश मिळवल्यानंतर गेल्यावर्षी 'पुष्पा २: द रुल'ने थिएटर गाजवलं. 'पुष्पा २' हा सिनेमा आतापर्यंतच्या अनेक सिनेमांचे रेकार्ड ब्रेक करणारा सिनेमा ठरला. या चित्रपटाच्या दोन्ही भागांना प्रेक्षकांचा उदंड प्रतिसाद मिळाल्यानंतर आता या चित्रपटाच्या तिसऱ्या भागाची चाहते आतुरतेने वाट पाहत आहेत. 'पुष्पा ३' ची झलक दुसऱ्या भागाच्या शेवटीच दिसली होती. त्यामुळे तिसरा भाग येणार हे तेव्हाच कन्फर्म झालं होतं. निर्माते रविशंकर यांनी पुष्पा ३ अपडेट शेअर केली आहे. ते म्हणाले, सध्या अल्लू अर्जुनकडे दोन सिनेमे आहेत. एका सिनेमाचं दिग्दर्शन ॲटली करत आहे तर दुसरा सिनेमा त्रिविक्रम डायरेक्ट करत आहे. सुकुमार आणि अल्लू अर्जुन दोघांचेही हातातील सिनेमे पूर्ण होतील तेव्हाच पुष्पा ३ चं काम सुरु होईल. त्यामुळे सिनेमा २०२८ मध्ये रिलीज होऊ शकतो, त्यामुळे चाहत्यांना प्रतिक्षा करावी लागणार आहे. २०२१ सआली आलेल्या 'पुष्पा:द राइज' सिनेमाने जगभरात ३५०.१ कोटींची कमाई केली. या भरघोस यशानंतर तीन वर्षांनी आलेल्या 'पुष्पा २: द रुल'ने थेट १२३४.१ कोटींची रेकॉर्डब्रेक कमाई केली. जगभरात सिनेमाचं कलेक्शन तब्बल १७४२.१ कोटींचं झाले आहे.

# मी बॉलिवूड शब्दाचा फॅन नाही

दक्षिणेतील प्रसिद्ध अभिनेता अल्लू अर्जुनचा 'पुष्पा २' हा चित्रपट गेल्या वर्षी ५ डिसेंबर रोजी प्रदर्शित झाला होता. 'पुष्पा २' ने जागतिक स्तरावर १,८०० कोटी रुपयांपेक्षा जास्त कमाई केली आहे. अल्लू अर्जून याने बॉक्स ऑफिसवर सलमान खान, शाहरुख खान यांच्या सर्व सिनेमांचे रेकॉर्ड मोडलेत. 'पुष्पा २' हा भारतात सर्वांत जास्त कमाई करणारा चित्रपट ठरला आहे. नुकतंच शनिवारी हैदराबादमध्ये 'पुष्पा २'च्या चाहत्यांचे आभार मानण्यासाठी एका खास कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी अल्लू अर्जूनने चाहत्यांचे, दिग्दर्शक सुकुमार आणि एका बॉलिवूड दिग्दर्शकाचे आभार मानलेत. अल्लू अर्जून बॉक्स ऑफिसवरील संघर्ष टाळल्याबद्दल एका बॉलिवूड चित्रपट निर्मात्याचे आभार मानले. पण, त्याने त्या चित्रपटाचं नाव घेतलं नाही. पण, तो चित्रपट छावा असल्याचा अंदाज नेटकऱ्यांचा आहे. कारण, छावा हा चित्रपट ६ डिसेंबर २०२४ रोजी प्रदर्शित होणार होता. पण, तो पुढे ढकलण्यात आला होता. अल्लू अर्जूनने म्हटलं, त्यादिवशी मी बॉलिवूडमधील... बॉलिवूड या शब्दाचा चाहता नाही. मी हिंदी चित्रपटसृष्टीतील एका व्यक्तीला फोन केला. त्यांचा चित्रपट ६ डिसेंबरला प्रदर्शित होणार होता. त्यांनी खूप मदत केली आणि तारीख पुढे ढकलली. मी स्वतः त्यांना फोन केला आणि तारीख वाढवल्याबद्दल त्यांचे आभार मानले. 'पुष्पा २' च्या यशाबद्दल अल्लू अर्जुनने दिग्दर्शक सुकुमार आणि चाहत्यांचे आभार मानले. त्यांनी चित्रपटाचे वर्णन 'फक्त एक चित्रपट नाही तर एक भावना' असं केलं. तो म्हणाला,माझ्यासाठी पुष्पा हा चित्रपट नाही. हा ५ वर्षांचा प्रवास आहे. ही एक भावना आहे. संध्या थिएटर चेंगराचेंगरी प्रकरणात अटक आणि जामीन मिळाल्यानंतर शनिवारी संध्याकाळी अल्लू अर्जून पहिल्यांदा कार्यक्रमात पोहचला होता.





# प्रसाद ओक साकारणार एकाच सिनेमात तब्बल पाच भूमिका

मराठी सिनेसृष्टीतील हरहुन्नरी अभिनेता प्रसाद ओक याने त्याच्या अनेक सिनेमांमधून लक्षवेधी भूमिका साकारलेल्या आहेत. त्याच्या भूमिका या नेहमीच लक्षात राहण्यासारख्याच असतात. प्रसादने अभिनयासोबतच अनेक सिनेमांचे दिग्दर्शनही केले आहे. तसेच काही सिनेमात दिग्दर्शन आणि अभिनय या दोन्ही भूमिका त्याने चोख पार पाडल्या आहेत. आता प्रसाद त्याच्या आगामी एका सिनेमातून प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे. या सिनेमात तो एक नव्हे तर तब्बल पाच भूमिका साकारणार आहे. यामुळे त्याच्या सुशिला सुजीत या सिनेमाची बरीच चर्चा होत असून त्याचा सिनेमातील अभिनय पाहण्यासाठी चाहते उत्सुक झाले आहेत. सुशीला सुजीत या सिनेमाचं प्रसादने दिग्दर्शन आणि निर्मिती देखील केली आहे. तसेच मराठीतील अनेक कलाकार देखील या सिनेमातून पाहायला मिळणार आहेत. एखादा कलाकार एखाद्या सिनेमात दुहेरी फार तर तिहेरी भूमिका साकारल्याची अनेक उदाहणे आपण पाहिली आहेत. मराठी सिनेमासृष्टीत पहिल्यांदाच एक अभिनेता तब्बल पाच भूमिका साकारताना पाहायला मिळणार आहे. अभिनेता प्रसादने आजवर अनेक हिट सिनेमे दिले आहेत. त्याच्या प्रत्येक सिनेमातील भूमिका ही लक्ष-वेधी राहिलेली आहे. आता तो सुशीला सुजीत या नव्या सिनेमात साकारणाऱ्या पाच भूमिका कोणत्या असणार आहेत याविषयी मोठी चर्चा होत आहे. या सिनेमाची कथा प्रसादनेची लिहिली आहे .एवढ्या सगळ्या भूमिका आणि त्या सुद्धा एकाच चित्रपटासाठी निभावणं ही खरंतर तारेवरची कसरत असणार आहे, ही कसरत निभावण्यात प्रसाद यशस्वी ठरणार का यासाठी १८ एप्रिलपर्यंत वाट पाहावी लागणार आहे. या दिवशी सुशीला सुजीत हा सिनेमा सिनेमागृहात प्रदर्शित होणार आहे.

# एवढे मोठेपणाच्या नावाखाली जगतात आणि...



अभिनेते सयाजी शिंदे यांनी आपल्या सकस कलाकृतींनी आणि अभिनयाच्या जोरावर मराठीसह हिंदी, साऊथ सिनेइंडस्ट्रीतही आपला वेगळा ठसा उमटवला आहे. सयाजी शिंदे यांचे फॅन्स जगभरात आहेत. दरम्यान नुकतेच सयाजी शिंदे यांनी त्यांच्या चाहत्यांना मोलाचा सल्ला दिला आहे. सयाजी शिंदे यांनी एका कार्यक्रमात म्हटले की, स्टेटस काय आहे. स्टेटस आपल्या मनाचा खेळ ठरवला या झोपडीत माझ्या राजा सजे महाली ते ज्यांनी कोणी ओळ लिहिली असं बघितलं ना तुम्ही. आहात तिथं जर तुम्ही राजास-रखेच असाल तर तुम्हाला कोण विचारतंय. तुमच्या मनाचा काय खेळ चाललाय ते नाहीतर किती बघतो आपण की एवढे कर्ज करतात आणि सुसाईड करतात एवढे मोठेपणाच्या नावाखाली जगतात आणि त्यांची वाट लागते काहीतरी मनाचे खेळ आहेत सगळे आनंदी राहायला मन शुद्ध लागतं बस्स. सयाजी शिंदे यांनी १९९५ साली अबोली या चित्रपटातून अभिनेता म्हणून पदार्पण केले. त्यांनी बऱ्याच मराठी नाटकात काम केले आहे. त्यापैकी सखाराम बाईंडर यांच्या भूमिकेचे खूप कौतुक झाले होते. झुल्वा, वन रूम किचन आणि आमच्या या घरात ही नाटके त्यांची गाजली. त्यानंतर त्यांनी बऱ्याच मराठी चित्रपटांमध्ये भूमिका केल्या. त्यापैकी गोष्ट छोटी डोंगरा एवढी या चित्रपटात कृषिमंत्री म्हणून त्यांची भूमिका सर्वांच्या लक्षात राहिली. त्यांनी बऱ्याच हिंदी आणि दाक्षिणात्य चित्रपटात काम केले आहे. सयाजी शिंदे यांचे चाहते दक्षिण सिनेसृष्टीतही भरपूर आहेत.

# मराठी अभिनेत्री दिसणार तेलुगु सिनेमात



असे अनेक मराठी कलाकार आहेत ज्यांनी मराठी चित्रपटसृष्टीबरोबरच बॉलिवूड आणि टॉलीवूड इंडस्ट्रीही गाजवली आहे. देवदत्त नागे, तेजस्विनी पंडित, सोनाली कुलकर्णी या कलाकारांनंतर आता आणखी एक मराठी अभिनेत्री साऊथ इंडस्ट्री गाजवण्यासाठी सज्ज आहे. बबन सिनेमातून प्रसिद्धीझोतात आलेली अभिनेत्री प्रांजली कंझारकरने तेलुगु सिनेमातून साऊथमध्ये पदार्पण केलं आहे. 'डॉली-स्टोरी ऑफ अ वॉरीअर' असं या तेलुगु सिनेमाचं नाव आहे. 'डॉली- स्टोरी ऑफ अ वॉरीअर' या चित्रपटात प्रांजलीने बॉक्सरची भूमिका साकारली आहे. डॉली या चित्रपटाचे दिग्दर्शक के के किरण कुमार दुर्गा असून कथा- संवाद ही त्यांनीच लिहिले आहेत. या चित्रपटाची निर्मिती के क्रांथी यांनी केली असून संगीत माही कोंडेती यांचे आहे. अभिनेत्री प्रांजली कंझारकर आणि अभिनेता के के किरण कुमार दुर्गा हे प्रमुख भूमिकेत आहेत. तर टेम्पर वामशी, रमा देवी, के के किरण कुमार दुर्गा, श्रीधर रेड्डी, यशवंत कोसी रेड्डी हे कलाकार या चित्रपटात झळकले आहे. डॉली चित्रपटाचे संपूर्ण चित्रीकरण हैदराबाद येथे झाले आहे. अभिनेत्री प्रांजली कंझारकर हीने या आधी बबन, एकदम कडक, मनोमनी असे मराठी चित्रपट तर जॅकी श्रॉफ यांच्यासोबत चिडीया उड या हिंदी वेबसिरीजमध्ये काम केले आहे. आता 'डॉली-स्टोरी ऑफ अ वॉरीअर' या तेलुगू चित्रपटामुळे तीची साऊथ इंडस्ट्रीत वेगळी ओळख निर्माण होत आहे. अभिनेत्री प्रांजली डॉली चित्रपटाच्या अनुभवाविषयी सांगते, मला करोना संपल्यानंतर डॉली चित्रपटाविषयी विचारण्यात आलं. मी या चित्रपटाची स्टोरी ऐकली तेव्हा माझ्या लक्षात आलं की इथे लँग्वेज बॅरीअर नाही आहे. म्हणून मी लगेचच होकार दिला. बॉक्सरच्या भूमिकेसाठी मला फिजीकली स्ट्राँग राहणं गरजेचं होतं. या चित्रपटासाठी मी एक वर्ष ट्रेनिंग घेतलं. माझ्यासाठी चित्रपटाचा हा अनुभव ड्रीम कम ट्रू होता. पुढे ती बॉक्सरच्या भूमिकेसाठी घेतलेल्या ट्रेनिंगविषयी सांगते, डॉली चित्रपटाचं चित्रीकरण हैदराबादमध्ये होतं. आम्ही जिथे ट्रेनिंग करायचो. त्याच जीममध्ये आम्ही चित्रीकरण केलं. मी या भूमिकेसाठी ८ किलो वजन कमी केले. साइन लँग्वेज, तसेच दोन्ही हाताने लिहायला शिकले. १०० वर्ष जुन्या असलेल्या मंदिरात या चित्रपटातील गाण्यांचं शूट झालं. क्लायमॅक्स आणि फाइटिंग सीन एकाचवेळी भरपावसात शूट केले. मी पहिल्याच तेलुगू चित्रपटात एकाच भूमिकेत खूप गोष्टी शिकले. दिग्दर्शक के के किरण कुमार दुर्गा आणि टीमसोबत काम करताना खूप मजा आली. डॉली चित्रपटाला प्रेक्षकांचा भरघोस प्रतिसाद मिळत आहे. तुमचं असंच प्रेम माझ्या सर्व चित्रपटांवर राहो हीच इच्छा.

# जिनके अपने घर शीशे के हो..

## करडा, करारी, एकमेवाद्धितीय राजकुमार..!

**बोलघेवड्याची मातीही विकल्या जाते तर शांत व्यक्तीचे सुवर्णही पडून राहते' ही उक्ती पदोपदी हिंदी चित्रपटसृष्टीत आपण अनुभवत असतो. दिखाऊपणा व सदैव चर्चेत राहण्याची असोशी हे हिंदी चित्रपट तारे-तारकांच्या मनी-मानसी खोलवर रुजलेले आहेच. आपले गुण गात असतानाच इतरांची प्रच्छन्न निंदा करणे हादेखील हिंदी चित्रपटसृष्टीचा स्थायीभाव. 'आपली आपण करी स्तुती, तो एक मूर्ख' असे समर्थांनी जरी ठासून सांगितले असले, तरीही हिंदी चित्रपटसृष्टीला ते फारसे मान्य नव्हते व नाही. जातिवंत कलाकार हा विक्षिप्त व लहरी असतो, असे एक समाजमान्य गृहितक आहे. जगापेक्षा वेगळा दृष्टिकोन, वेगळी वेषभूषा व एकंदरीतच विस्कळीत मनोव्यापार ही कलाकाराची व्यवच्छेदक लक्षणे..! शिस्तबद्धता व घड्याळ यांच्याशी फारसे सख्य नसलेले अनेक कलाकार हिंदी चित्रपटसृष्टीने मागील शतकात (म्हणजे इसवी सन २००० पर्यंत) बघितले.**

आपल्या मस्तीत व ऐटीत संपूर्ण कारकीर्द करणाऱ्या कलाकारांच्या यादीत 'जानी' राजकुमार यांचे नाव अग्रस्थानी येते. अर्थात, उगवत्या सूर्यासच वंदन करणाऱ्या व मावळतीस अर्घ्यही न देणाऱ्या हिंदी चित्रपटसृष्टीचा हा पुरातन रिवाज आहे की, 'दुभत्या गायीच्या लाथा गोड..!' म्हणजेच, याचा एक अर्थ असाही होतो की, राजकुमार शेवटपर्यंत व्यावसायिक व आर्थिक यशाचे नाव होते. ८ ऑक्टोबर १९२६ रोजी लारलाई, बलुचिस्तान (सध्या पाकिस्तानात) येथे काश्मिरी पंडित कुटुंबात जन्मलेल्या कुलभूषण पंडित यांच्या सुरुवातीच्या आयुष्याची फारशी माहिती प्रयत्न करूनही मिळत नाही. १९४० च्या दशकाच्या शेवटी-शेवटी ते मुंबईत आले व बॉम्बे पोलिस विभागात उपनिरीक्षक म्हणून त्यांनी सेवा प्रारंभ केली. मात्र, त्यांनी पोलिस सेवेचा राजीनामा दिला. विख्यात सिने-छायाचित्रकार धरम चोपडा हे त्यांचे मित्र होते व त्यांच्या सहकार्याने त्यांना १९५२ साली 'रंगिली' या चित्रपटात भूमिका मिळाली. त्याचवर्षी त्यांना 'अनमोल सहर', पुढल्या वर्षी 'आबशार' व १९५५ साली 'घमंड' या चित्रपटात भूमिका मिळाल्या. पण हे सर्व चित्रपट पडले. त्यामुळे राजकुमार हे कोणाच्याही खिजगणतीत नव्हते. बऱ्याच संघर्षानंतर त्यांना त्यांच्या जीवनातील पहिली लक्षणीय भूमिका मिळाली ती 'मदर इंडिया' (१९५८) या चित्रपटात. अर्थात, या चित्रपटाचे श्रेय मेहबूब खान यांचे निर्देशन व नर्गिस यांच्या अभिनयास गेले. तरीदेखील राजकुमार लक्षात राहतात. त्यांचे व्यक्तिमत्त्व करारी होते व आवाज घनगंभीर तसेच हिंदी चित्रपटाच्या नायकाला त्या दशकात अत्यावश्यक असलेल्या गुणांचा, म्हणजे प्रणयकथेत शोभून दिसण्याचा व सामाजिक, कौटुंबिक चित्रपटात सामावून जाण्याचा त्यांच्यात अभाव होता. त्यांच्या व्यक्तिमत्त्वास साजेशी भूमिका त्यांना मिळाली ती १९५९ च्या 'पैगाम' चित्रपटात. राजकुमार यांना हिंदी चित्रपटसृष्टीत स्थिरावण्यास मदत केली ती 'दिल अपना और प्रीत परायी' (१९६०) या चित्रपटाने. याच्याच अगोदर आलेल्या 'उजाला' (१९५९) चित्रपटातील त्यांची नकारात्मक 'कालू' ही भूमिकादेखील गाजली. राजकुमार यांची चपखल भूमिका असलेला चित्रपट म्हणजे 'दिल एकमंदिर' (१९६३). कॅन्सरग्रस्त रोगी 'राम'ची भूमिका राजकुमारने पुरेशा गांभीर्याने साकारली. पत्नीचा भूतपूर्व प्रियकर शस्त्रक्रिया करणार आहे, हे समजल्यानंतरही विचलित न होणारा व पत्नीच्या पातिव्रत्याचा मान राखणारा राजकुमार अविस्मरणीय होता. त्यांची भेदक नजर व प्रभावी संवादफेक प्रकर्षाने लक्षात राहते.



विशेषतः 'चलो बुलावा आ गया' हा शस्त्रक्रियेला जाण्याअगोदरचा संवाद..! या भूमिकेसाठी त्यांना सर्वोत्कृष्ट सहायक अभिनेत्याचा फिल्मफेअर पुरस्कार प्राप्त झाला. त्याचवर्षी मुन्शी प्रेमचंद यांच्या कादंबरीवर आधारित 'गोदान' चित्रपटात त्यांनी 'होरी' ही कादंबरी नायकाची भूमिका साकारली. राजकुमार यांना 'राजकुमार' बनवण्याचे श्रेय जाते ते निःसंशयपणे 'वक्त' (१९६५) या चित्रपटास. खऱ्या अर्थाने बहु-सितारे असलेल्या 'वक्त'मध्ये राजकुमारने कमाल केली आहे.

अतिशय थंड व भेदक संवादफेकीने राजकुमार रातोरात 'संवादसम्राट' म्हणून विख्यात झाले. आत्मविश्वासी, कडक चाल, पांढरे बूट व उत्तम परिधान हे राजकुमार यांच्या 'राजा' या व्यक्तिरेखेचे विशेष. 'ये बच्चों के खेलने की चीज नही..' व 'जिनके अपनो के घर शीशोंके हो, वो लोगोंपर पत्थर नहीं फेका करते..' या संवादांना चिरंतन लोकप्रियता प्राप्त झाली. अर्थात परत एकदा त्यांना फिल्मफेअर पुरस्कार प्राप्त झाला. त्याचवर्षी आलेल्या 'उँचे लोग' या चित्रपटातील इन्स्पेक्टर श्रीकांत ही भूमिका राजकुमार यांच्या व्यक्तिमत्त्वास चपखल बसली. 'हमराज' (१९६७), 'नई रोशनी' हे यशस्वी चित्रपट राजकुमार यांचा प्रभाव गडद करण्यास कारणीभूत ठरले. या सुमारास त्यांच्या विक्षिप्तपणाचे किस्से सर्वतोमुखी होऊ लागले. कोणाचाही पाणउतारा करणे, आपल्या सहकलाकारांचा अपमान करणे व आपल्या मनासारखे संवाद लिहून घेण्यासाठी संवादलेखक व दिग्दर्शकांवर दबाव टाकणे, हे किस्से त्यांच्या बाबतीत नेहमीचे झाले. त्यांच्या शैलीबाज व अखखड प्रस्तुतीचे असंख्य चाहते गावोगावी होते. त्यांना फक्त राजकुमार यांची प्रभावी संवादफेक व छापमारू वावर यांच्याशी कर्तव्य असे. त्यामुळेच आपल्या खांद्यावर एकहाती चित्रपट ते तारू शकत नाही व नायकास आवश्यक असलेले बहुसंख्य गुण त्यांच्यात नाहीत, हे तथ्य चित्रपटनिर्मात्यांनी सदैव दृष्टिआड केले व राजकुमार यांच्या सर्व लहरी, नाईलाजास्तव का होईना सहन केल्या, ही वस्तुस्थिती.

१९७० च्या दशकात प्रथम राजेश खन्ना व नंतर अमिताभ बच्चन यांच्या झंझावातातही ते टिकून राहिले. १९७३ च्या 'हिंदुस्तान की कसम'मध्ये त्यांची प्रमुख भूमिका होती. ३६ घंटे, एक से बढकर एक, कर्मयोगी ('बेटे मोहन, मरते हुए बाप को बिडी के दो कश तो पिला जा' हा संवाद याच चित्रपटातील), चंबल की कसम ('सिमटी हुई हे घडियां' हे सुश्राव्य गीत त्यांच्यावर चित्रित झाले होते) ही त्यांची १९७० च्या दशकातील चित्रसंपदा. १९९० च्या दशकातील 'सौदागर' (१९९१) (दिलीपकुमार यांच्यासमोर) व 'तिरंगा' (नाना पाटेकर यांच्यासमवेत) विशेषत्वाने राजकुमार ही नाममुद्रा रसिकांवर ठसवून गेली. १९९५ सालचे 'जवाब' व 'गॉड अँड गन' हे त्यांचे शेवटचे चित्रपट. १९९६ साली त्यांचा मृत्यू झाला. आयुष्याच्या शेवटपर्यंत त्यांच्याभोवती गूढतेचे वलय होते व ते चित्रपट यशस्वी करण्याचा हुकुमी एक्का समजले जात. कोणालाही ते 'जानी' म्हणून संबोधत. नंतर माझ्या लाडक्या कुत्र्याचे नाव 'जानी' आहे, अशी अपमानजनक मखलाशी ते करत. इतकी वर्षे हिंदी चित्रपटसृष्टीत घालवूनही त्यांनी आपल्या परिवारासंदर्भात खाजगीपणा प्राणपणाने जपला. स्वतःला टक्कल असूनही (ते कायम केसांचा टोप परिधान करत) लोकांना 'टकलू' म्हणणारे, इतिहास चित्रपटात हिंदू व्यक्तीची भूमिका करत असूनही पत्नीला 'बेगम' संबोधणारे, लहरी, विक्षिप्त राजकुमार!

(लेखक सिनेमाचे अभ्यासक आहेत.)

देवेंद्र प्रभूणे

# 'कवी कलश' साकारणाऱ्या अभिनेत्याचा नवा अवतार

छावा सिनेमाची सध्या चांगलीच चर्चा आहे. या सिनेमातील छोट्या छोट्या व्यक्तिरेखाही लोकांच्या लक्षात राहिल्या. या सिनेमात प्रमुख भूमिकेत आपल्याला विकी कौशल, रश्मिका मंदाना आणि अक्षय खन्ना हे कलाकार झळकले. 'छावा' सिनेमातील आणखी एक व्यक्तिरेखा चांगलीच गाजली ती म्हणजे कवी कलश. अभिनेता विनीत कुमार सिंगने ही भूमिका साकारली. अशातच 'छावा'नंतर विनीतच्या नव्या सिनेमातील खास लूक समोर आलाय. जाणून घ्या...

विनीत कुमार सिंग आगामी 'जाट' सिनेमात झळकणार आहे. या सिनेमातील विनीतचा फर्स्ट लूक समोर आला आहे. डोळ्यांवर गॉगल, रंगीबेरंगी शर्ट अशा अवतारात विनीत एकदम हटके दिसत आहे. सोमुलु असं विनीतच्या कॅरेक्टरचं नाव आहे. 'जाट' सिनेमात विनीत सनी देओलसोबत झळकणार आहे. 'छावा'नंतर विनीत कुमार सिंग 'जाट' सिनेमात काय कमाल करतो, याची सर्वांना उत्सुकता आहे. विनीतचा हा नवीन लूक समोर येताच चाहत्यांनी पसंती दिली आहे.

सनी देओलची प्रमुख असलेला 'जाट' सिनेमा १० एप्रिल २०२५ ला रिलीज होणार आहे. या सिनेमात सनी देओलसोबत मुख्य खलनायक म्हणून रणदीप हुडा दिसणार आहे. 'पुष्पा २' जेव्हा रिलीज झालेला तेव्हा त्यासोबत 'जाट'चा टीझर १२,५०० स्क्रीनवर दाखवण्यात आला. हा ॲक्शन पॅक्ड टीझर पाहिल्यानंतर सर्वांना जाट सिनेमा थिएटरमध्ये पाहण्याची उत्सुकता आहे. छावानंतर विनीतला 'जाट' सिनेमात बघायला सर्वांची उत्सुकता शिगेला आहे.



# करण कुंद्रा आणि तेजस्वी प्रकाश लवकरच लग्नबंधनात?




अभिनेता करण कुंद्रा आणि अभिनेत्री तेजस्वी प्रकाश लवकरच लग्नबंधनात अडकणार आहेत. दोघे बिग बॉस १५ च्या घरात भेटले आणि एकमेकांच्या प्रेमात पडले. ज्यानंतर दोघांची चांगलीच चर्चा रंगलेली दिसते. चाहते देखील त्यांच्या लग्नाची आतुरतेने वाट पाहत आहेत. सेलिब्रिटी मास्टरशेफच्या शोमध्ये तेजस्वीच्या आईला फराह खानने तेजस्वीच्या लग्नाबद्दल विचारले. यावेळी तेजस्वीने आयुष्यातील कठीण काळातील अनुभव देखील शेअर केला आहे. फराहने शादी कब होगी? असा प्रश्न तेजस्वीच्या आईला विचारला. त्यावर, अभिनेत्रीच्या आईने याच वर्षी तेजस्वी लग्न करणार असल्याचे सांगितले. त्यानंतर फराह खानने तेजस्वी प्रकाशचे अभिनंदन केले, तर अभिनेत्री लाजून म्हणाली, असं काही नाही. तेजस्वी प्रकाशने करण कुंद्रासोबत कोर्ट मॅरेज करण्याचे संकेत दिल्यानंतर काही दिवसांनी हे घडले. तेजस्वीने शोमध्ये आईच्या संघर्षाबद्दलही सांगितले. वडील आम्हाला सोडून परदेशात गेल्यानंतर तिचा आणि तिच्या भावाचा आईने एकटीनेच सांभाळ केला. हे ऐकल्यानंतर तेजस्वीची आईही भावूक झाली. अलिकडेच, करणनेही सेलिब्रिटी मास्टरशेफमध्येही तेजस्वीच्या कामाचे कौतुक केले आणि सांगितले की शोचे स्वरूप खूप कठीण असले तरी, तेजस्वी तिचे उत्तम प्रयत्न करण्यात कोणतीही कसर सोडत नाही. करण आणि तेजस्वी सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात सक्रिय असतात आणि त्यांचे क्यूट फोटो सतत पोस्ट करत असतात. त्यांच्या फोटोवर चाहत्यांकडूनही लाइक आणि कमेन्टचा वर्षाव होतो.

# किंग खान नेगेटीव्ह व्यक्तीरेखेत

बॉलीवूडचा किंग खान डिसेंबर २०२३ मध्ये डंकी या चित्रपटात दिसला होता. त्यानंतर शाहरुखचा एकही चित्रपट प्रदर्शित झालेला नाही. सध्या त्याच्या किंग या चित्रपटाची जोरदार चर्चा होत आहे. या चित्रपटातील कास्ट फायनल झाली असून लवकरच चित्रपटाच्या चित्रीकरणाला सुरुवात केली जाणार आहे. शाहरुखकडे अनेक चित्रपट आहेत, त्या चित्रपटांविषयीच्या बातम्या येत आहेत. अशातच आता एका चित्रपटाच्या निमित्ताने शाहरुख आणि पुष्पा चित्रपटाचे दिग्दर्शन एकत्र येणार आहे, अशी चर्चा सोशल मीडियावर केली जात आहे. या चित्रपटाचे नाव अद्याप ठरलेले नाही. मात्र, या चित्रपटात शाहरुख नकारात्मक भूमिका साकारणार आहे. शाहरुखने याअगोदर काही मोजक्याच चित्रपटात नकारात्मक भूमिका साकारलेली होती. १९९४ मध्ये प्रदर्शित झालेल्या अंजाम चित्रपट, यश चोप्राचा 'डर', 'बाजीगर'मध्येही त्याने साकारलेल्या नेगेटीव्ह पात्र, या सर्वच पात्रांना प्रेक्षकांनी अनोखा प्रतिसाद दिला होता. त्यामुळे आता सुकुमार यांच्या चित्रपटातही शाहरुख पुन्हा एकदा नकारात्मक भूमिका साकारणार असल्याने याची उत्सुकता त्याच्या चाहत्यांना लागली आहे. या नव्या प्रोजेक्टबद्दल अजूनही कोणतीही अधिकृत गोष्ट समोर आलेली नाही.

शाहरुख आणि सुकुमार यांच्या टीमकडूनही नव्या प्रोजेक्टबद्दल कोणताही दुजारा देण्यात आलेला नाही. शाहरुखबद्दल बोलायचे झाले तर तो लवकरच 'किंग'च्या शूटिंगला सुरुवात करणार आहे. निर्मात्यांना हा चित्रपट मार्च किंवा एप्रिलमध्ये फ्लोअरवर घ्यायचा होता. पण नुकतीच बातमी आली होती की चित्रपटाचा दिग्दर्शक सिद्धार्थ आनंद स्क्रिप्टच्या काही भागात बदल करत आहे. त्यानंतर किंगच्या शुटिंगला सुरुवात केली जाणार आहे.



# अमिताभ ठरले सर्वाधिक कर भरणारे सेलिब्रिटी



बॉलीवूडचे महानायक अमिताभ बच्चन हे भारतीय चित्रपटसृष्टीतील सर्वात दिग्गज अभिनेत्यांपैकी एक आहेत. मागील सहा वर्षांपासून ते इंडस्ट्रीत काम करत आहेत. ८२ वर्षांचे अमिताभ बच्चन या वयातही अनेक चित्रपटांमध्ये महत्त्वाच्या भूमिका साकारत आहेत. ते शेवटचे 'कल्की एडी २८९८' मध्ये अश्वत्थामाच्या भूमिकेत झळकले होते. हा चित्रपट २०२४ मधील सर्वाधिक कमाई करणार्या चित्रपटांपैकी एक होता. या चित्रपटाच्या दुसर्‍या भागाची तयारी सुरू आहे. याचदरम्यान अमिताभ बच्चन यांच्या उत्पन्नाबद्दल मोठी माहिती समोर आली आहे. एका रिपोर्टनुसार, अमिताभ बच्चन यांनी २०२४-२५ या आर्थिक वर्षात तब्बल १२० कोटी रुपये कर भरला आहे. वर्षभरातील त्यांची एकूण कमाई ३५० कोटी रुपये होती. त्यांनी चित्रपट, ब्रँड एंडोर्समेंट्स आणि 'कौन बनेगा करोडपती' होस्ट करून ही कमाई केली आहे. ते वयाच्या ८२ व्या वर्षी सिनेविश्वात सर्वाधिक कमाई करणाऱ्या व्यक्तींपैकी एक ठरले आहेत. बिग बी यांनी १५ मार्च २०२५ रोजी २०२४-२५ या आर्थिक वर्षातील शेवटची ॲडव्हान्स टॅक्स इन्स्टॉलमेंट म्हणून तब्बल ५२.५० लाख रुपये भरले. अमिताभ बच्चन वेळेवर कर भरतात, हे त्यांच्या या कृतीतून दिसून येत आहे. अमिताभ बच्चन आता शाहरुखला मागे टाकून सर्वाधिक कर भरणारे सेलिब्रिटी ठरले आहेत. मागच्या वर्षी, शाहरुखने अंदाजे ९२ कोटी रुपये कर भरला होता. पण यंदा अमिताभ यांनी तब्बल १२० कोटी रुपये कर भरून शाहरुखला मागे टाकलं आहे. अमिताभ यांच्या कामाबद्दल बोलायचं झाल्यास ते छोट्या पडद्यावर 'कौन बनेगा करोडपती' होस्ट करण्यासाठी ओळखले जातात. या क्विझ रिॲलिटी शोच्या आगामी पर्वाचे होस्ट म्हणून अमिताभ दिसणार नाही अशा चर्चा काही दिवसांपूर्वी होती. त्यांची जागा या शोमध्ये शाहरुख खान किंवा त्यांची सून ऐश्वर्या राय बच्चन घेणार असल्याचं म्हटलं जात होतं. पण अमिताभ बच्चन यांनी स्वतःच पोस्ट करून या चर्चांना पूर्णविराम दिला. तसेच 'कौन बनेगा करोडपती'च्या आगामी पर्वात होस्ट म्हणून परतण्याचं आश्वासन चाहत्यांना दिलं.